I J R S S I S, Issue (IX), Vol. (I), May 2023: 133-139
A Double-Blind Peer Reviewed Journal
OPEN ACCESS
e-ISSN 2347 – 517X
Original Article

INTERNATIONAL JOURNAL OF RESEARCHES IN SOCIAL SCIENCE AND INFORMATION STUDIES

© VMS RESEARCH FOUNDATION www.ijrssis.in

# गडचिरोली जिल्हयातील आदिवासींच्या धार्मिक संस्थावर शहरीकरणाचा परिणाम - एक अध्ययन

**पी. एन वाघ[१] व अरुण तुकाराम कोडापे[२]**
[१]श्री. जी. सी. पाटील मुनघाटे कला वाणिज्य तथा विज्ञान महाविद्यालय धानोरा
[२]गोंडवाना विद्यापिठ, गडचिरोली

| Communicated : 18.01.2023 | Revision : 25.02.2023<br>Accepted : 25.03.2023 | Published : 30.05.2023 |
|---|---|---|

**सारांश :**
आदिवासी चा सरळ सोपा अर्थ आदि म्हणजे पूर्वी पासुन वासी म्हणजे रहिवासी किंवा वास्तव्य करुन राहणारा समाज होय. अश्या या आदिवासी जमातीचे गडचिरोली जिल्हयात प्रमाणजास्त आहे. जिल्हयातील एकुण लोकसंख्येच्या तुलनेत ३८.१७ टक्के लोकसंख्या ही अनुसूचित जामतीची आहे. त्यामुळे आदिवासींची जिल्हा अशी ओळख सूपर्ण राज्यात गडचिरोलीची आहे. जिल्हयातील आदिवासीच्या धार्मिकते संदर्भात संशोधन केले असता आढळून येणारी महत्वाची बाब म्हणजे, शहरातील राहणाऱ्या नवीन पिठीत इतर धर्माबददलची आस्था वाढलेली दिसुन येत आहे. ग्रामिण व आदिवासी बहुल क्षेत्रात येणारे शहरीभागातील नौकरदार वर्ग, ठेकेदार, व्यावसायिक यांच्या सोबतच्या संपर्कातून त्यांच्या धर्माचा प्रभाव आदिवासी समाजावर पडुन हिंदु व इतर धर्मियांच्या चालरीती व पुजा अर्चणामध्ये शहरातील लोकांप्रमाणे बदल घडून आल्याचे लक्षात येते.

**मुख्यशब्द** : आदिवासी गोंड, परधान निसर्गधर्म

**आदिवासी** चा सरळ सोपा अर्थ आदि म्हणजे पूर्वी पासुन वासी म्हणजे रहिवासी किंवा वास्तव्य करुन राहणारा समाज होय. आधुनिक समाजाचा भारताच्या दृष्टीने विचार केला तर नागरी समुदाय व ग्रामिण समुदाय या दोन भागातच भारतीय समाजाची विभागणी केलेली दिसून येते. पण देशातील दुर्लक्षित परिसरातील समुहाकडे पाहिजे त्या प्रमाणात लक्ष दिले जात नाही. तो समाज म्हणजे अति दुर्गम डोंगरळात भागात, रानावनात व इतर समाजापासुन अलिप्त राहणरा असाा हा आदिवासी समाज होय.

देशातील मुळ निवासी म्हणुन वेरिअर एल्विन तसेच ठक्कर बाप्पा यानी त्यांना आदिवासी म्हटले आहे. देशातील इतर समाजापासुन वेगळा दिसणारा, भासणारा, अलिप्त असणारा व अंतर्मुखी असणारा हा आदिवासी समाज त्याची भाषा, त्याचा वंश व धर्म याा वेगळया जिवन शैलीचा विचार करता हा समाज इतर समाजापेक्षा या जमातीचे वेगळेपण दिसुन येते.

अश्या या आदिवासी जमातीचे भारतात ४२७ प्रकार आहेत. १९९१ च्या जनगणने प्रमाणे एकुण लोकसंख्येच्या तुलनेत आदिवासी जमातीची लोकसंख्या ७.८ टक्के आहे. भारतीय संविधानात आदिवासींची परिभाषा नाही. कलम ३४१ आणि ३४२ मध्ये केलेल्या तरतुदीप्रमाणे तयार केलेल्या अधिसुचित समाविष्ट केलेल्या जमातींना अनुसूचित जनजाती असे म्हणतात.

प्राचीन काळात कोणत्याही भाषेत जमाती, जनजाती आदिवासी असे शब्द नव्हते गोंड, परधान असे नवानेच त्यांचा उल्लेख करण्यात येत असे. ब्रिटीशांच्या काळात अश्या दुर्लक्षित समाजाकडे प्रशासकीय दृष्टीने फायदयासाठी या समाजाला हिंदू मुस्लीम व इतर समुहापासुन त्यांना वेगळे करण्यात आले.

अश्या या आदिवासी जमातीचे गडचिरोली जिल्हयात प्रमाणजास्त आहे. जिल्हयातील एकुण लोकसंख्येच्या तुलनेत ३८.१७ टक्के लोकसंख्या ही अनुसूचित जामतीची आहे. त्यामुळे आदिवासींची जिल्हा अशी ओळख सूपर्ण राज्यात गडचिरोलीची आहे. जिल्हयातील आदिवासी विशिष्ट अशी संस्कृती या समाजाला इतर समाजापासुन वेगळे करते. वागणुकीने साधी-भोळी, प्रकृती पुजक, कोया

धर्माला माणनारी ही जमाती आधुनिक काळात काहीशी संभ्रमित असलेली दिसून येत आहे.

जिल्हयातील आदिवासीच्या धार्मिकते संदर्भात संशोधन केले असता आढळून येणारी महत्वाची बाब म्हणजे, शहरातील राहणा+या नवीन पिठीत इतर धर्माबददलची आस्था वाढलेली दिसुन येत आहे. ग्रामिण व आदिवासी बहुल क्षेत्रात येणारे शहरीभागातील नौकरदार वर्ग, ठेकेदार, व्यावसायिक यांच्या सोबतच्या संपर्कातून त्यांच्या धर्माचा प्रभाव आदिवासी समाजावर पडुन हिंदु व इतर धर्मियांच्या चालरीती व पुजा- अर्चणामध्ये शहरातील लोकांप्रमाणे बदल घडून आल्याचे लक्षात येते.

**आदिवासी धर्म :**

आदिवासी समाज हा मुर्तिपुजक नाही. निसर्गाच्या पुजेला महत्व देणारा हा समाज खरे तर निसर्गाने आपल्याला जिवन जगण्यासाठी सहाय्य केले आहे. अश्या सर्वाचे आभार मानणारा हा समाज इतर धर्मियांना प्रेरणा देणारा आहे.

आत्मा, मुत्यूनंतरचे जिवन, पूर्वक पुजा यावर आधारित विधी इतर धर्माप्रमाणेच असलेले दिसुन येते. कुठल्याही शुभकार्य प्रसंगी किंवा नवीन पिकांच्या उत्पादनानंतर व उत्पादनापूर्वी निसर्गाचे आभार मानण्यासाठी पुजा व नृत्या व्दारे आनंद व्यक्त करण्यासाठी आदिवासी समाज गोटुल मध्ये एकत्र होतो.

जिल्हयातील आदिवासींचा मुख्य धर्म कोईतुर धर्म आहे. धर्मसंस्थापक पहांदी पारी कुपार लिंगो ची आराधना केली जाते. आदिवासीचे आराध्य दैवत पेरसापेन, यांची प्रत्येक कार्याच्या शुभारंभास पूजा केली जाते याशिवाय बुढालपेन/बडादेव यांची सुध्दा पुजा प्रत्येक आदिवासी समाजात होत असलेली आढळून येते. जयसेवा हा या समाजाचा गोंडी धर्म मंत्र आहे. आदिवासी व्यक्ती एकमेकास अभिवादन करतांना या मंत्राचा उपयोग करतात. आदिवासींच्या धार्मिक कार्यात मुठपुजेला महत्व पूर्ण स्थान आहे. कोणतेही धार्मिक कार्य करतांना पाच पुजारी (भूमक) एकत्रित येवून मुठपुजा करतात. जन्म, विवाह व मृत या तिन्ही संस्काराचा आदिवासी समाजात फार महत्वपुर्ण स्थान आहे.त्यामुळे धार्मिक कार्य करणारे भूमकाचे आदिवासी समाजात फार महत्वपूर्ण स्थान असलेले दिसुन येते. जादु व धार्मिक अनुष्ठाण करणे आदिवासींच्या जिवनाचा एक अभिभाज्य भाग असलेला संसोधनाअंती निदर्शनास आले. भुमका, भगत यांच्या अंगी दैवीशक्ती असते व आपल्या जिवनातील दु:ख दुर करण्याचे कार्य तो करु शकतो असा विश्वास आदिवासी समाजात आढळून येतात.

जिल्हयातील सर्वच जमातीत सारख्याच प्रकारचे धार्मिक अनुष्ठान असले दिसून येते.

**आदिवासींची धार्मीक परिभाषा :**

भारतातील इतर धर्माची परीभाषा व आदिवासींच्या धर्माची परिभाषा ही वेगवेगळी असलेली दिसुन येते. आदिवासींच्या दिवसाचा प्रारंभ हा निसर्गाच्या सानिध्यात होतो व दिवसाचा अंतही निसर्गाच्या सहाय्यानेच होतो. आदिवासींचा धर्म कोणता याची अजुनही आदिवासींना माहिती नाही. केवळ कुलचिन्हाची माहिती त्यांच्या जवळ आहे.

त्यामुळे नागरी जिवनाच्या सानिध्यात येवून हिंदु व ख्रिश्चन धर्माचे आचरण करतांना लागलेली दिसुन येते डॉ. गोविंद गारे यांनी आदिवासींच्या धर्म हा निसर्गधम मानला आहे.

डॉ. विनायक तुकाराम यांच्या मते, 'जीवनात विवेक, अविवेक देण्याचे सामर्थ्य धर्म देतो' असे म्हटले आहे. डॉ

विनायक तुकाराम यांनी गोंडी धर्माच्या संकल्पनेला महत्व दिले आहे.

देशातील धार्मिक अस्मीतेच्या लढाईत आज आदिवासी समाज हा त्याच्या धर्माच्या अस्तित्वाच्या प्रश्नासी लढतांना दिसतो आहे. त्यामुळे आदिवासींच्या मुळ धर्माच्या विचारांचा शोध सामान्य आदिवासी नागरिकापर्यंत पोहचणे गरजेचे आहे. यासाठी समाजातील विचारवंत, प्राध्यापक यांच्या मार्फत आदिवासी धर्माचा शोधचा प्रारंभ झाला आहे.

कार्ल मार्क्सच्या मते, 'धर्म ही अफुची गोळी आहे' यानुसार समाजातील इतर धर्मामध्ये त्यांच्या स्वधर्माची नशा चढलेली दिसुन येते. पण आदिवासी समाजामध्ये धर्माबध्दलची कटटरता पुर्वीपासुन नाही व सदयास्थिती मध्ये पण नाही.

त्यामुळे काही आदिवासी आपला धर्म हिंदू सांगातात काही आदिवासी ख्रिश्चन सांगतात त्यामुळेच आदिवासींमध्ये इतर धर्माच्या तुलनेत धर्मांतराचे प्रमाण जास्त असलेले दिसुन येते. त्यामुळे एल. के. मडावी यांनी आदिवासी सिंधू संस्कृतीचे वारसदार आहे असे म्हटले आहे. आदिवासी मध्ये मुर्तीपुजा नसल्यामुळे मंदिराचे प्रमाण नगण्य असते. गावाबाहेर, गोटुलच्या बाहेर, झाडाखाली, टेकडीच्या गुहे मध्ये आदिवासींची श्रध्दास्थाने, ग्रामदेवी, माराई, वाघोबा देव यांची प्रतिमा असलेली दिसून येते. आदिवासींचा निसर्गधर्म हा निसर्गाच्या चमत्कारामुळे त्याप्रती असलेला भितीयुक्त आदरामुळे निर्माण झाला आहे. त्यामुळे निसर्गधर्माचा कुणीही संस्थापक नाही. हे आदिवासीच्या धर्माचे मुख्य वैशिष्टये आहे. निसर्गधर्म हाच मानवधर्म आहे व मानवाला श्रेष्ठ समजुन त्यांच्या विषयी आस्था ठेवणारा आदिवासी समाज हा इतर धर्मीयांच्या तुलनेत श्रेष्ठ आहे. असे तरी सध्या जानवते.

**गडचिरोली जिल्हयातील आदिवासीचे महत्वपुर्ण धार्मिक स्थळ :**

१) राजमाता मंदीर कुंमकोट :-

कोरची तालुक्यातील मुख्यालयापासुन ३ कि.मी अंतरावर राजमाता मंदीर हे आदिवासीच्या श्रध्देचे महत्वपुर्ण स्थान आहे. जानेवारी महिण्यातील पहिल्या आठवडयात येथील मंडईला सुरुवात होते. आंगादेवाचे झेंडे घेवून तालुख्यातील भावीक, भुमका, भगत एकत्र येतात व देवीची पुजा करतात जानेवारी महिण्यातच कोरची येथील टिपागढ येथे पोर्णिमेला भावीक गढ चढुन जातात व रात्रोभर तलावाजवळ वस्तीने करुन राहतात. ही यात्रा पाच दिवस गडावर असते.

२) झाडापापडा येथील कुलदैवत :-

गडचिरोली पासुन ७२ कि.मी अंतरावर असलेले धानोरा तालुक्यातील झाडापापडा या महाकाय दगडांच्या गुहेत कुलदेवतांची पुजा केली जाते.

३) गोंडी धर्म प्रसारकेंद्र परसवाडी (दुधमाळा) :-

मनिरावण दुगा यांनी १९९२ मध्ये गोंडी धर्माच्या प्रसारासाठी धानोरा तालुक्यातील दुधमाळा गावापासुन १ कि.मी आतमध्ये महाराष्ट्रातील हे परसवाडी हे एकमेव असे गाव आहे जिथे गोंड राजा रावणाची पुजा केली जाते.

४) सुरजागड :-

जानेवारी महिण्यात एटापल्ली तालुक्यातील सुरजागड येथे ठाकुर देवाची यात्रा भरविण्यात येते.

५) अहेरी :-

दसरयाचा सर्वात मोठा सण अहेरीतील राजघराण्यातून मिरवणूक काढून देवीची पुजा केली जाते.

६) गोरजाई देवी वैरागड :-

माना जमातीचे आराध्य दैवत गोरजाईमातेचे हे मंदिर नागवंशीय माना राजा कुरुमप्रहोद यांची इंस ८५० मध्ये बांधलेले आहे.

७) बाबलाई माता मंदिर बेजुर :-

भामरागड तालुक्यातील बेजुर गावालगतच्या बेजुर कोंगा पहाडीच्या पायथ्याशी बाबलाई मातेचे मंदिर आहे. जानेवारी महिण्यात या यात्रेचे आयोजन केले जाते. आपली भाषा संस्कृती प्रथा परंपरा व रितीरिवाज जिवंत ठेवण्यासाठी भव्य सांस्कृतीक कार्यक्रमाचे आयोजन केले जाते. परिसरातील आदिवासींचे सर्व सण(पंडूम) साजरे केले जाते.

८) बाजागड :-

धानोरा तालुक्यातील मुरुमगाव पासून ६ कि.मी अंतरावर कुलभटटी गावाच्या उत्तरपुर्वेस बाजागड हा डोंगर आहे. चैत्र पोर्णिमेला गोंडी धर्म संस्थापक पहांदी पारी कुपार लिंगो च्या नावाने यात्रा भरविली जाते.

९) झेंडेपार :-

येथे आदिवासींचे पेन देवांची मनोभावे पुजा करतात. व परिसरातील निसर्गाचे संरक्षण करण्याचे प्रतिज्ञा केली जाते.

**आदिवासींच्या धार्मीक कार्यात भुमकांची भुमिका :**

आदिवासींच्या धार्मिक कार्यातील महत्वाची भुमिका वटवनारा मुख्य भाग म्हणजे धर्मातील पुंजारी, भगत किंवा भुमका हा असतो. आदिवासींच्या जिवनातील कुठलेही कार्य असो. भुमका ते पार पाडीत असतो. जिवनाच्या सुरुवाती पासून म्हणजे जन्मापासून तर जिवनाच्या अंतापर्यत म्हणजे मृत्यूपर्यंतचे सर्व कार्य हा पुंजारी करीत असतो. पुंजारीचे जिल्हयातील सर्व आदिवासी जमातीत महत्वाचे स्थान असलेले दिसून येते. शासकीय कामात सुध्दा प्रशासन शासनाच्या योजनांची माहिती पुरविण्याच्या कामात या भुमकांची मदत घेत असतो. पोलीस प्रशासनाच्या जनजागरण मेळाव्यात या भुमकांची महत्वाचे स्थान दिले जाते.पुजारांचे आदिवासी जमातीतील महत्व बघून शासकीय अधिकारी वर्ग त्यांना महत्वपुर्ण भुमिका वठविण्यास समाजाच्या समोर करतात.

आदिवासींच्या श्रध्देला काही प्रमाणात अंधश्रध्देमध्ये रुपांतर करण्यामागे या भुमकांची महत्वपुर्ण भुमिका असलेली दिसून येते. पण या भुमकांचे जिवन सुध्दा पाहिजे तितके सोपे नाही. यांचे पुर्ण अस्तित्व हे त्यांच्याकडे असलेल्या मांत्रिक शक्तीवर आधारीत असते. त्यामुळे या शक्तीला जागृत ठेवण्यासाठी त्यांना कठोर नियमाचे पालन करावे लागते. वेगवेगळया कार्यासाठी मंत्रविधी वेगवेगळी असलेली आपणास दिसून येते. या भुमकाकडे केवळ मांत्रिक शक्ती नाहीतर वनऔषधीचे ज्ञान सुध्दा फार प्रमाणात असते त्यामुळे गडचिरोली जिल्हयातील अशा वैद्यींना औषध उपचारासाठी प्रशासनाकडून परवानगी पत्र सुध्दा प्राप्त झाले आहेत.

**जिल्हयातील आदिवासींच्या धार्मिक संस्थेत गोटुलचे स्थान** :आदिवासींच्या धार्मिक संस्थेमध्ये प्राचीन काळापासून गोटूलचे धार्मिक व संस्कृती शिक्षणाचे केंद्र म्हणून महत्वपुर्ण स्थान आहे. कोया पुनेम संस्थापक मुठवापोय पहांदी पारी कुपार लिंगो यांनी प्राचीन काळी गोटूलची स्थापना करुन आपल्या शिष्यांना कोया पुनेम चे शिक्षण देवून गोंडवाना भुमिवर धर्माचा (कोया पुणेम) प्रसार करण्यास सांगितले.

गोटूल या शब्दाचा विग्रह केल्यास गो+टूल असा होतो. गोंडी भाषेत गो म्हणजे गोंगो म्हणजेच दु:ख निवारणारी शक्ती तर टूल म्हणजे ठिकाण, स्थळ किंवा जागा असा त्याचा अर्थ होतो. वय वर्ष ३ ते १८ पर्यंतच्या

मुला मुलींना भावी जिवनात आवश्यक असणारया शिक्षणासोबतच धर्माची शिकवण देण्याचे कार्य गोटूल मध्ये होते. जिल्हयातील आदिवासी मध्ये कुठलाच लिखीत ग्रंथ नाही त्यामुळे जमातीतील धार्मिक प्रथा, चालीरीती, परंपरा इत्यादींचे ज्ञान लोककथा, लोकनृत्य त्यांच्या माध्यमातून गोटूलमधील युवक व युवतींना दिले जाते.

अशा या गोटूलचे एकुण ३ प्रकार असते. १) युवा गोटूल २) सामाजिक गोटूल ३)पेन (धार्मीक) गोटूल वरील प्रत्येक गोटूलचे कार्य हे वेगवेगळे असते व ते एकमेकांच्या कार्यात हस्तक्षेप करीत नाही. गोटूलची स्थापना गावच्या मध्यभागी किंवा निसर्गरम्य शांत व प्रसन्न वातावरणाच्या जागेवर केली जाते. गोटूलच्या समोर मातीने सारवलेले खुप मोठे अंगण असते पारी कुपार लिंगोचे प्रतिक म्हणून उंच खांब गाढलेला असतो. व रात्रोच्या वेळेस या खांबाची पुजा करुन नृत्याला प्रारंभ केली जाते. पंन्डूम (सण) च्या वेळेस मुल-मुली श्रृंगार करुन नृत्य करीत असतात. या गोटूलमध्ये संगित, नृत्य, वाद्य, खेळ व जिवनावश्यक सर्वच गोष्टींचे शिक्षण मिळतच असते पण त्यासोबत कोयापुणेम संस्कृतीचे दर्शन व ज्ञान गोटूल मधूनच युवक युवतींना प्राप्त होत असते. अशा या गोटूलची उच्च कोटीची संस्कृती जतन करण्याची परंपरा आधुनिक काळात व वेगाने होणा-या शहरीकरण्याच्या आक्रमणात टिकवून ठेवने आवश्यक आहे. त्यामुळेच धार्मीक कार्यक्रमाचे नेत्यांकडून आयोजन केले जाते. व महाराष्ट्र शासनाने सुध्दा गोटूलच्या कार्याची दखल घेवून शासकीय निधीतून गोटूलचे बांधकाम केल्याचे जिल्हयात आढळून आले आहे.

**कोया ज्ञानबोध संस्कार गोटूल स्कुल, मोहगाव :**

आदिवासी मुलांमध्ये गोंडी भाषा, आदिवासी रितीरिवाज, कोया धर्माची परंपरा टिकून रहावी व त्यांना त्याचे ज्ञान प्राप्त व्हावे याकरीता गोंडी शाळेची स्थापना आदिवासी पारंपारीक इलाका व ग्रामसभेने ठराव घेवून २ ऑक्टोबर २०१९ ला वर्ग १ते ३ पर्यंत संध्या वर्गाला सुरुवात केली आहे.

**शहरीकरणाच्या प्रभावाने आदिवासींच्या धार्मीकतेमध्ये पडलेला फरक :**

परंपरागत पध्दतीने होणारी धार्मिक अनष्ठाने पुजा यांच्यात काही प्रमाणात बदल झालेले दिसून येत आहे. डोंगरद-यात गुहेत गावाबाहेर राहणारी त्यांची देवस्थाने हिंदू व इतर धर्माच्या प्रभावामुळे गावात आलेली दिसून येत आहेत. हिंदू धर्माच्या प्रभावामुळे आदिवासींच्या घरात हिंदू देवदेवतेंची पुजा होवू लागली आहे. ख्रिशन धर्माच्या आक्रमणाने सुध्दा जिल्हयातील आदिवासींमध्ये ख्रिश्चन धर्माचे पालन होतांना दिसून येत आहे. हिंदूचे व ख्रिश्चनांचे सन समारंभ मोठया उत्साहाने साजरे होतांना जिल्हयाती दिसून येत आहेत.

**हिंदू धर्माचा प्रभाव :**

दुर्गम भाग सोडला तर जिल्हयातील सुगम भागात आदिवासींच्या घरात गणपती, हनुमान, गौरी, दुर्गापुजा मोठया प्रमाणात होत असलेले दिसून येत आहेत. जिल्हयातील अनेक आदिवासी क्षेत्रात येणारे इतर धर्मीय शिक्षक अधिकारी वर्ग व आदिवासींचा जवळचा संपर्कात येणा-या वनविभागातील कर्मचारी, अधिकारी, ठेकेदार इत्यादी लोकांच्या सततच्या संपर्कातून हिंदू व इतर धर्माचा प्रभाव आदिवासी लोकांवर पडला असे असले तरी दुर्गम भागातील आदिवासींनी काही मर्यादे पर्यंत हिंदूचे धार्मीक सण व धार्मिक देवीदेवता विश्वास त्यांचा स्विकार केला आहे.

**ख्रिश्चन धर्माचा प्रभाव :**

इंग्रजांनी जिल्हयातील सिरोंचा व लगतच्या जिल्हयातील ब्रम्हपूरी क्षेत्रात केलेल्या आगमनामुळे ख्रिश्चन मिश्नरी यांचा जिल्हयात प्रवेश झाला. जिल्हयातील साधा भोळा आदिवासी आपल्या धर्माच्या प्रसारासाठी त्यांनी निवडला आदिवासींच्या अज्ञानाचा गरीबीचा फायदा ख्रिश्चन मिश्नरी यांनी उचलला. आदिवासींच्या धर्मांतरासाठी त्यांनी नियोजनबध्द प्रयत्न केले. त्यासाठी दवाखाने शाळा मुलांसाठी वस्तीगृह इत्यांदीचे प्रलोबन आदिवासी समाजाला दिले. त्यामुळे आदिवासी क्षेत्रात फार मोठया प्रमाणात ख्रिश्चन धर्माचा फैलाव झाला. याचाच परिणाम म्हणून आदिवासींच्या परंपरागत धर्म आणि जिवन जगण्याच्या पध्दती फरक पडलेला दिसून येत आहे.

**जिल्हयातील सामाजिक व धार्मिक जागृती :**

आदिवासींच्या धार्मिकतेवर इतर धर्मांचा वाढता प्रभाव बघून जिल्हयातील आदिवासी साहित्यीक व विचारवंत मनिरावन दुगा यांनी समाजाला जागृत करण्यासाठी समाज प्रबोधनाचे कार्य सुरु केले आदिवासी संस्कृती जिल्हयातून नष्ट होते की काय अशी परिस्थीती जिल्हयात निर्माण झाली होती. त्यामुळे जिल्हयातील समाजसुधारक मणिरावन दुगा यांनी शेजारील जिल्हयात (गोंदिया) देशातील आदिवासींचे धार्मिक स्थळ असलेले कचारगड येथे आचार्य मोतीरावन कंगाली आणि के.बी मरस्कोल्हे यांनी गावक-यांच्या सहकार्याने यात्रा सुरु केली. त्यामुळे गडचिरोली जिल्हयातील आदिवासींमध्ये धार्मिक अस्मिता जागृत होवून परंपरागत धार्मिक विधींना पुनर्जिवन प्राप्त झाले.

**उददेश :-**

१) जिल्हयातील आदिवासींच्या धार्मिक स्थितीचे अध्ययन करने.

२) इतर धर्माचा पडलेल्या प्रभावाचा अभ्यास करणे.

३) आदिवासींच्या धार्मिकतेवर इतर धर्माच्या अनुसरणामुळे झालेल्या बदलांचा अभ्यास करणे.

४) आदिवासीच्या धार्मिकतेत पडलेल्या फरकांमुळे निर्माण झालेल्या समस्यांचा अभ्यास करणे.

५) आदिवासींच्या समाजातील धार्मिक जनजागृती चळवळीचा अभ्यास करणे.

६) धार्मिकतेमुळे निर्माण झालेल्या अंधश्रध्दांचा अभ्यास करणे.

**उपकल्पना :-**

१) आदिवासी समाजावर इतर धर्मांचा प्रभाव पडला आहे.

२) जिल्हयातील आदिवासी समाजात धार्मिक कटटरता निर्माण होतांना दिसते आहे.

३) आदिवासींच्या नविन पिढीत धार्मिक अस्मीता निर्माण होत आहेत.

४) पारंपारीक धार्मिक अनुष्ठाने व पुजा अर्चनाच्या निर्मीतीला सुरुवात होत आहेत.

५) नविन पिढीची आदिवासीी युवक युवतीमध्ये धार्मिक अस्मिता संवर्धन व प्रसाराची भावना निर्माण होत आहे.

**संशोधन आराखडा :-**

प्रस्तुत संशोधनासाठी वर्णनात्मक संशोधन आराखडयाचा विचार करण्यात आला.

**नमुना निवड :-**

संशोधन कर्त्याने गैरसंभाव्यता नमुना निवडीचा वापर केला आहे. उददेशपुर्ण नमुना निवड पध्दतीचा वापर केला आहे.

**तथ्य संकलन :-**

तथ्य संकलनासाठी प्राथमिक स्त्रोतातील निरीक्षण तंत्राचा तसेच दुय्यम स्त्रोतातील पुस्तके व प्रकाशित आदिवासी साहित्यांचा समावेश करण्यात आला.

**निष्कर्ष :-**

१) गडचिरोली जिल्हयातील आदिवासींच्या धार्मिकतेचा अभ्यास केला असता काही अंशी हिंदू धर्माचे आचरण करणारे आदिवासी दिसून आले आहे.

२) आदिवासींच्या धर्मस्थळांचा अभ्यास केला असता काही ठिकाणी हिंदू देवतांचा प्रभाव दिसून आला आहे.

३) निसर्गपुजक असणारा आदिवासी मुर्तीपुजक झालेला दिसून आला आहे.

४) आदिवासी जमातीतील काही विशिष्ट लोकांना धार्मिक स्थळांबाबत आस्था दिसून आली.

५) दुर्गम भागात आदिवासींमध्ये कटटर धार्मिकता दिसून येते.

६) भुमका, पुजारी व भगताचे महत्व आदिवासी समाजात कमी झालेले दिसून आले.

७) सुशिक्षीत नविन पिढी समाजातील धार्मिक अंधश्रध्दांना विरोध करतांना दिसून येत आहे.

८) जिल्हयातील धार्मिक चळवळींचा प्रभाव समाजावर दिसून आला.

९) नविन पिढी कोयतूर धर्माच्या प्रसारात अग्रेसर असलेली दिसून आली.

१०)शहरात राहणारे आदिवासी जमात हिंदू धर्माचे आचरण करतांना दिसून आले.

**संदर्भ :**

आत्राम व्यंकटेश ;१९८९द्ध दृ गोंडी संस्कृतीचे संदर्भ दृ प्रकाशन बि.एस.पी महाराष्ट्र नागपूर

बोधनकर डॉ. सुधीर प्रा. विवेक अलोने ;२००७द्ध दृ सामाजिक संशोधन पध्दती दृ श्री. प्रकाशन नागपूर

देवगावकर डॉ. शैलजा ;१९८०द्ध दृ वैदर्भीय आदिवासी दृ आनंद प्रकाशन

कुलकर्णी डॉ. शौनक ;२००९द्ध . महाराष्ट्रातील आदिवासी दृ डायमंड पब्लीकेशन पुणे

कंगाली मोतिराम आचार्य ;१९८४द्ध दृ गोंडवानाका सांस्कृतीक इतिहास दृ प्रकाशन तिरुमाय चंद्रलेखा कंगाली नागपुर

नैताम नंदकिशोर ;२०१६द्ध दृ गोंडी संस्कृतीची वास्तविकता दृ गोंडवाना गोटूल साहित्य निर्मीती व प्रकाशन संस्था मेंढा ;लेखाद्ध जि. गडचिरोली.